# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-20.05.2026** **वार- बुधवार**

---

**प्रशिक्षण**

केंद्रीय गृह विभाग आणि राज्य गृह विभागाकडून 360 स्वयंसेवकांना क्षमता बांधणी आणि विकास प्रशिक्षण देण्यात आलं आहे. याअंतर्गत पाठ्यक्रम पूर्ण करणाऱ्या स्वयंसेवकांना प्रशस्तीपत्र देऊन प्रोत्साहित करण्यात आलं. प्रत्यक्ष युध्दाच्या वेळेस सीमेवर भुदल, नौदल आणि वायुदलाचं सैनिकी बल कर्तव्य करत असतातच परंतु, प्रत्यक्ष नागरिकांमध्ये युध्दाच्या परिस्थितीमध्ये नागरी संरक्षण दलांची भूमिका ही फार महत्वाची असते. याच धर्तीवर हे प्रशिक्षण देण्यात आलं आहे.

**गौणखनिज**

केंद्र शासनाच्या खाण आणि खनिजे (विकास आणि विनियमन) अधिनियम, १९५७ अंतर्गत राज्य शासनाला गौण खनिजासंबंधी नियम तयार करण्याचे तसंच स्वामित्वधन निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार राज्य शासनानं महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास आणि विनियमन) नियम, २०१३ लागू केले असून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी गौण खनिजावरील स्वामित्वधन वसुलीचं जिल्हानिहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात आलं आहे. त्यामध्ये पुणे जिल्ह्यासाठी साडे तीनशे कोटी रुपयांचं महसूल उद्दिष्ट देण्यात आलं आहे. मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खनन होणार नाही यासाठी उत्खनन स्थळांची वेळोवेळी पाहणी करून ETS मशीनद्वारे मोजणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महसुली विभागांनी दिलेलं उद्दिष्ट पूर्ण करणं आवश्यक असून विभागीय आयुक्तांना आवश्यकतेनुसार विभागांतर्गत जिल्ह्यांच्या उद्दिष्टांमध्ये फेरबदल करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

**गोजातीय**

राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारनं महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३ लागू केला आहे. मात्र, अद्याप क्षेत्रीय स्तरावरील खाजगी कृत्रिम रेतन सेवादाता आणि संस्थांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडं नोंदणी केली नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळं संबंधितांवर या अधिनियमांतर्गत कारवाई करण्याचे निर्देश पुण्याचे पशुसंवर्धन आयुक्त डॉक्टर किरण पाटील यांनी दिले आहेत. कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे आणि प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना आळा घालणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.

**शीतल-तेली**

भारतीय प्रशासकीय सेवेतील वरीष्ठ अधिकारी शीतल तेली- उगले यांनी आज पुणे विभागीय आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारला. यापूर्वी पुणे महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदाच्या त्यांच्या कारकिर्दीदरम्यान पुणे महानगरपालिकेला 'स्कॉच ऑर्डर ऑफ मेरिट', तसंच सर्वोत्तम कार्यपद्धतींसाठीचा हुडको पुरस्कार यासह अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

**जनगणना**

जनगणना २०२७ अंतर्गत घरयादी आणि घरगणनेच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात पिंपरी चिंचवड शहरात १६ मे २०२६ पासून सुरू झाली असून, ही प्रक्रिया १४ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. नागरिकांनी प्रगणकांना योग्य आणि संपूर्ण माहिती

देऊन सहकार्य करावं तसंच स्व-नोंदणी केलेल्या नागरिकांनी आपला स्वयं नोंदणी क्रमांक उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.

या माहितीच्या आधारे शासन विविध विकासकामांचं नियोजन, सुविधा वितरण तसेच सामाजिक कल्याण योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करतं. नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि अचूक माहितीमुळे भविष्यातील शहर विकासाला दिशा मिळेल असं उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.

**मसाप**

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा १२१वा वर्धापन दिन समारंभ आणि पुरस्कार प्रदान सोहळा मंगळवारी २६ मे रोजी आयोजित करण्यात आला असून मसाप जीवनगौरव पुरस्कारानं ज्येष्ठ लेखिका प्रतिभा रानडे यांचा तर डॉक्टर भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कारानं डॉक्टर श्रीकृष्ण काकडे यांचा गौरव केला जाणार आहे, अशी माहिती परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. दुपारी ४ वाजता बालगंधर्व रंगमंदिरात हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ संगीतकार, गायक पंडित सत्यशील देशपांडे, लेखक, दिग्दर्शक, अभिनेते हृषिकेश जोशी, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग आणि मराठी भाषा विभाग मंत्री उदय सामंत यावेळी प्रामुख्यानं उपस्थितं असणार आहेत.

**स्वच्छ**

स्वच्छ सर्वेक्षण २०२५–२६ अंतर्गत शहराच्या स्वच्छता व्यवस्थेचं मूल्यमापन करण्यासाठी प्रत्येक नागरिकानं, स्वतःहून पुढाकार घेत आपला अभिप्राय नोंदवून पिंपरी-चिंचवड शहराला देशात मानाचं स्थान मिळवून देण्यासाठी सहकार्य करावं, असं आवाहन आयुक्त डॉक्टर विजय सूर्यवंशी यांच्या वतीनं करण्यात आलं आहे. अभिप्राय नोंदविण्यासाठी नागरिकांनी cf.sbmurban.org या संकेतस्थळाला भेट देऊन विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, असं आवाहन महापालिकेच्या वतीनं करण्यात आलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दुपारनंतर आकाश ढगाळ राहिल्यानं उष्णतेपासून थोडी उसंत मिळाली. उद्या कमाल तापमान 38 तर किमान 24 अंश सेल्सियस राहून दुपारनंतर आकाश ढगाळ राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**